# आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण मुख्य इमारत कक्ष
# पुणे महानगरपालिका
# आदर्श कार्यप्रणाली व संपर्क यंत्रणा २०२१

१. पुणे महानगरपालिकेचे पूर नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन सन २०२१-२०२२ संपर्क क्रमांकाची यादीतील संपर्क क्रमांकावर संबंधित खात्याशी प्राप्त तक्रारीचे स्वरूप पाहून संपर्क साधणे.
२. नियंत्रण कक्षातील सेवकांनी तक्रार प्राप्त झाल्यानंतर घटनेचे ठिकाण/ वेळ /व्यक्तीचे संपर्क क्रमांक याबाबतची माहिती नियंत्रण कक्षातील रजिस्टर मध्ये नोंद करणे आवश्यक आहे.
३. नियंत्रण कक्षातील सेवकांने दररोज पाटबंधारे विभाग/ सिचंन भवन /भारतीय हवामान खाते/ जिल्हाधिकारी कार्यालय प्रत्येक शिफ्ट मधील सेवकांने फोन करून माहिती घेणे व त्याप्रमाणे रजिस्टर मध्ये नोंद ठेवणे आवश्यक आहे.
४. शिफ्ट मधील सेवकांनी रिलीव्हर आल्याशिवाय कार्यालय सोडता कामा नये.
५. मंत्रालय कंट्रोल रूम /विभागीय आयुक्त कार्यालय/जिल्हाधिकारी कार्यालय/पोलीस विभाग यांच्याकडून प्राप्त कॉल्सची खातेप्रमुखांना माहिती देणे.

| अ.क्र | संपर्क करावयाचे खाते/ विभाग | प्राप्त तक्रारीचा प्रकार | महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय स्तरावरील नियंत्रण कक्ष |
|---|---|---|---|
| १ | बांधकाम /भवन विभाग | १. मनपा मिळकती नदी / ओढे वरील पुलांचे लेबर कॅम्प बाबत तक्रार.<br>२. धोकादायक वाडे.<br>३. धोकादायक इमारती/इमारतीचे अपघात/ भिंती पडणे. | १) क्षेत्रिय स्तरावर पूरनियंत्रण कक्ष २४ तास यंत्रणा कार्यरत ठेवणे.<br>२) पावसाळा कालावधी दरम्यान कामे करणेसाठी जे.सी.बी., पोकलन,पोर्टेबल व स्थायी जनरेटर ,टिपर्स, जेटींग मशीन ,डिवाटीग पंप व इतर आवश्यक यंत्रसामुगी पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन ठेवणे.<br>३) सिंमाभिंतीना व इमारतीना |
| २ | ड्रेनेज विभाग | १. नाले, ओढे,नदी बाबत पूराची माहिती प्राप्त.<br>२. ब्लॉकेज, क्रिटीकल पॉईट,चॅनल्स<br>३. पाणी तुबंणे | |

<table>
<tr><td>३</td><td>पथ विभाग</td><td>१. खड्डे बुजविणे,क्रॉस कल्हर्टची कामे करणे,रिस्टेटमेटची कामे रस्त्यावर पाणी साठणे.</td><td rowspan="12">लागून असणारे झोपड्या ,पत्राशेड काढण्याची कार्यवाही करण्यात यावी.<br><br>४) इतर शहरातून व इतर राज्यातून नागरिकांचे स्थलांतर सुर आहे. त्याबाबत सदर स्थलांतरीत नागरिकांची योग्य ती तपासणी करणे ,औषधेपचार देणे,त्यांचे राहण्याचे व जेवण्याचे व्यवस्थेबाबत नियोजन करण्यात यावे.<br><br>५) पावसाळा कालावधी दरम्यान रस्त्यावरील पोल व ट्रान्सफार्मर यामधून विघुत प्रवाह वाहून व विजेचे तारांचा शॉक लागून मनुष्याची ,जनावरे जिवीतहानी व इतर नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.<br><br>६) पावसाळा कालावधी दरम्यान कोणतीही अनुचित घटना घडल्यास सदर प्रसंगी उपयोग पडणेसाठी अग्निशामक वाहने रग्णवाहिका व रग्णालये इत्यादी यंत्रणा सुस्थित ठेवणे.</td></tr>
<tr><td>४</td><td>पाणीपुरवठा विभाग</td><td>पाणी पुरवठी व पाईप लाईन बाबतच्या तक्रारी</td></tr>
<tr><td>५</td><td>बांधकाम विभाग</td><td>धोकादायक बांधकामे, धोकादायक शेड,गावठाणातील धोकादायक बांधकामांना नोटीस बजावणे</td></tr>
<tr><td>६</td><td>सदस्य सचिव तथा मुख्य उद्यान अधिक्षक/ वृक्ष अधिकारी</td><td>धोकादायक झाडे /फांद्या काढण्याचे / झाडे पडणे.</td></tr>
<tr><td>७</td><td>विद्युत विभाग</td><td>पोल, आर्थिंग, लाईट याबाबतचे तक्रारी.</td></tr>
<tr><td>८</td><td>आकाशचिन्ह विभाग</td><td>जाहिरात फलक बाबत</td></tr>
<tr><td>९</td><td>आरोग्य विभाग</td><td>पावसाळा दरम्यान जलजन्य व क्टिक जन्य साथीच्या आजारांच्या दृष्टीने जनजागृती करणे.झोपड्या व नाल्या लगतच्या भागात किटक नाशकांची फवारणी</td></tr>
<tr><td>१०</td><td>उप आयुक्त (परि.क्र.१ ते ५)</td><td>संबंधित परिमंडळ क्षेत्रातून प्राप्त तक्रारीबाबत कार्यवाही करणे. व सर्व क्षेत्रिय कार्यालयांशी समन्वय ठेवणे.</td></tr>
<tr><td>११</td><td>पी.एम.पी.एम.एल.विभाग</td><td>पूरसदृष्य परिस्थितीत नागरिकांना स्थलांतरित करणेकरिता बसेस उपलब्ध करून देणे.</td></tr>
<tr><td>१२</td><td>महावितरण विभाग</td><td>ट्रान्सफरमरची उंची वाढविणे, जळणे, शॉट सर्किट होणे इत्यादी बाबत</td></tr>
<tr><td>१३</td><td>पाटबंधारे विभाग</td><td>धरणातून होणाऱ्या विसर्गाची वेळोवेळी माहिती घेणे</td></tr>
<tr><td>१४</td><td>पोलीस/वाहतूक पोलीस</td><td>विसर्गाच्या वेळी बॅरेगींटींग करणे व नदी लगत वाहतूक बंद करणे इत्यादी बाबत.</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | आपत्ती व्यवस्थापन कक्ष | १.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून माहितीचे संकलन व माहिती संबंधित विभागांना पाठविणे.<br>२.पाटबंधारे विभागाकडून प्राप्त माहितीची नोंद ठेवणे व संबंधित खात्यास व क्षेत्रिय कार्यालयास कळविणे.<br>३. आय.एम.डी. कडून प्राप्त पावसा संदर्भाची माहिती सर्व विभांगाना कळविणे. | |